नियमीत फौजदारी खटला क्र. ७८/२०२१
निशाणी क्र. **१८/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुरेंद्र मच्छींद्र कवळे** |
| वय सुमारे | : | ४६ वर्षे, व्यवसाय : दुग्ध व्यवसाय |
| निवासस्थान | : | मु. पो.आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी वकील श्रीमती कविता परीट यांचेमार्फत</u>**:

मौजे आवास येथील गट क्र. २४६ ही मिळकत राजाराम मांधळे व सुभाष मांधळे यांच्याकडून माझे वडील व कृष्णाजी देवधर यांनी विकत घेतली होती. सदर मिळकत सध्या आमच्या ताब्यात आहे. दि. २६/०४/२०२१ रोजी प्रमोद राणे आमच्या जमिनीवर जे.सी.बी. फिरवत होते. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी प्रतिक्षा व ओंकार राणे होते. मी माझा भाऊ महेंद्र कवळे याला फोन करुन सदर बाब सांगितली. तो लगेच तेथे आला व मी दुध घेवून झिराड येथे निघालो. माझे भावाने फोन केला त्यामुळे मी दुध देवून परत आलो. तेव्हा माझे भावाच्या डोक्यातून रक्त येत होते. माझे भावाने मला सांगितले की, ओंकार व त्याच्या आईने काठी व दगडाने मारहाण केली आहे.

०२. त्यानंतर आम्ही झिराड पोलीस ठाणे येथे गेलो. माझे भावाचा घटनास्थळी चष्मा पडला होता त्यामुळे मी तेथे परत आलो होतो. त्या ठिकाणी जे.सी.बी. चालू होता. मी त्यांना काम बंद ठेवायला सांगितले. या व्यतिरिक्त मी आणखी काहीही केले नाही. आरोपींना मी ओळखतो. ते न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत** :

०३. आवासपासून झिराड येथे वाहनाने जायला १० ते १५ मिनिटे लागतात. मी झिराड येथे ०४.३० वाजता पोहोचलो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी ०४.४५ वाजता पोहोचलो. माझे भावाने मला भांडणाबाबतची माहिती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच मला फोनवरुन घटनेची संपूर्ण माहिती झालेली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी पोहोचल्यानंतर मी माझे भावाच्या डोक्याचे रक्त पाहिले असता मी त्याला विचारले व त्याने त्याबाबत मला सांगितले, असे घडले नाही. पोलीसांनी माझेकडे घटनेची चौकशी तिस–या दिवशी केली होती. दि. २९/०४/२०२१ रोजी माझेकडे चौकशी केली किंवा कसे हे मी निश्चित सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा जबाब मी वाचून पाहिलेला नव्हता. मी घटनास्थळी गेल्यानंतर माझे भावाला, 'काय झाले' असे विचारले होते.

०४. जागेवरुन आरोपींसोबत पूर्वीपासून वाद होते, हे मला माहीत नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आरोपींसोबत जागेवरुन पूर्वीपासून वाद आहे, असे सांगितले नव्हते. माझे जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकूर मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितला नव्हता. प्रमोद राणे घटनास्थळी हजर होता ही बाब जबाब देतेवेळी मी पोलीसांना सांगितली नव्हती. भावाचा चष्मा आणण्यासाठी घटनास्थळी गेलो असता तेथे जे.सी.बी. चालू होता त्यामुळे काम बंद ठेवा असे मी सांगितले होते, ही बाब पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितली होती.

०५. माझे भावाच्या कपड्यांवर व शरीरावर रक्त पडले होते. जमिनीवर सुद्धा रक्त पडले होते हे मी बघितले नाही. घटनास्थळ नेमके कोणते होते हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. मी माझे भावाला माझे स्कुटरवर पोलीस ठाण्यात घेवून गेलो होतो. स्कुटरवर सुद्धा रक्त पडले होते. पोलीसांनी माझे भावाचे रक्ताने माखलेले कपडे पाहिले कि नाही हे मला माहीत नाही.

०६. माझा भाऊ व माझेमध्ये, काय साक्ष द्यायची आहे याबाबत चर्चा झाली. माझे भावाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्यावर फौजदारी कार्यवाही होवू नये म्हणून त्याने सदर खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे भावाला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | समक्ष |
| ( **शै. वा. उगले** ) | ( **शै. वा. उगले** ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. | मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. |

अलिबाग.
दिनांक : **२३/०८/२०२२**.

नियमीत फौजदारी खटला क्र. ७८/२०२१
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संध्या सद्गुण काठे** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. कामथ, पो. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी वकील श्रीमती कविता परीट यांचेमार्फत</u>:**

दि. ०८/०५/२०२१ रोजी मला मारामारीच्या घटनेच्या पंचनाम्यासाठी पोलीस हवालादार श्रीमती वाघमारे यांनी आवास–टेकाळी येथे बोलावले होते. ताडाचे झाड होते तेथून थोड्या अंतरावर घटनास्थळ होते. शेतातील झाडे तोडून जाळलेली असल्याचे व साफसफाई केल्याचे दिसत होते. मला गट क्रमांक सांगता येणार नाही.

०२. तेथे घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा आहे. घटनास्थळ पंचनामा **निशणी क्र. २२** वर आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०३. दि. २७/०४/२०२१ रोजी अंदाजे ०१.३० ते ०२.०० वाजताच्या सुमारास पोलीसांशी संपर्क झाला होता. अंदाजे ०२.०० वाजता मी घटनास्थळी पोहोचले. तेथे फक्त पोलीस होते. त्यांच्या व्यतिरिक्त तेथे कोणीही नव्हते. घटनास्थळी मी ०२.३० वाजेपर्यंत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सह्या करुन ०२.३० वाजता माझे कामाला निघून गेले. ०२.३० वाजल्यानंतर माझा पोलीसांशी कोणताही संपर्क झालेला नव्हता.

०४. मी पंचनामा वाचलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०५/२०२१ रोजी मी घटनास्थळी गेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नमूद तारीख व वेळ चुकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझेसमक्ष कोणीही गट क्रमांक वगैरे सांगितला नव्हता. मी पोलीस पाटील असल्यामुळे केवळ पंचनाम्याकरीता गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तयार पंचनाम्यावर पोलीसांच्या सांगण्यावरुन सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनास्थळाचे अवलोकन करुन पोलीस ठाण्यात पंचनामा तयार केला होता व त्यावर मी सही केली.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                समक्ष

( **शै. वा. उगले** )                ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.  मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **२२/०९/२०२२**.

नियमीत फौजदारी खटला क्र. ७८/२०२१
निशाणी क्र. **२३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **महेंद्र मच्छींद्र कवळे** |
| वय सुमारे | : | ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | खारघर, नवी मुंबई |

**सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी वकील श्रीमती कविता परीट यांचेमार्फत:**

गट क्र. २६९ (पूर्वी गट क्र. २४६/९) चे मालक राजाराम मांदळे व सुभाष मांदळे यांच्याकडून खरेदी खत क्र. १०७७/१९९० नुसार माझे वडीलांनी व कृष्णाजी देवधर यांनी सामाईकांत विकत घेतला होता. या व्यवहाराबाबत न्यायालय व अप्पर आयुक्त यांच्या न्यायालयात वाद सुरु आहेत. सदर घटनेच्या एक आठवड्याआधी आरोपींनी जाळपोळ केल्याबाबत दि. २६/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजताच्या दरम्यान तक्रार केली होती. ठाणे अंमलदार वाघमुळे यांनी मला सांगितले की, आरोपी दुसऱ्या दिवशी जबाब द्यायला येणार आहेत. दि. २६/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वाजताच्या दरम्यान मी ग्रामंपचायतीमध्ये निरीक्षणाचे काम करत होतो. निरीक्षण आटोपून मी घरी आलो व सायं. ४.१४ मिनिटांनी मला माझे भावाचा फोन आला. त्याने मला सांगितले की, आपल्या जागेत जे.सी.बी. टाकलेला आहे तसेच प्रतिक्षा राणे व ओमकार राणे हे जे. सी.बी.ने झाडे तोडत आहेत. त्यानंतर मी माझी स्कूटी घेवून जागेवर ०४.३० वाजता पोहोचलो. त्यावेळी तेथे प्रतिक्षा राणेच्या हातात बांबूची काठी होती. ओमकार राणे तेथे दिसत नव्हता व विश्वनाथ कलभुर्गे जे.सी.बी. चालवत होता.

०२. मी विश्वनाथ कलभुर्गेला विचारले की, ''तू कोणाच्या परवानगीने

आमच्या जागेत जे.सी.बी. टाकला आहेस व झाडे तोडत आहेस व याविषयी पोलीस ठाण्यात सकाळी तक्रार दिलेली आहे.'' असे सांगितल्यानंतर मी त्याला जे.सी.बी. बाहेर काढायला सांगितले. ओमकार राणे जे.सी.बी.च्या मागून आला व त्याने अचानक माझी कॉलर पकडली व मला धक्का देवून पाडले. त्यानंतर त्याने माझे डोक्यात दगड मारला व प्रतिक्षा राणे हिने माझे डोक्यात बांबूची काठी मारली. रक्त निघत असल्याने मी तेथून पोलीस ठाण्यात तक्रार द्यायला निघालो तेवढ्यात माझा भाऊ झिराड येथे दुध टाकून आलेला होता. त्याच्यासोबत मी पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी तक्रार नोंदवून घेवून मला प्राथमिक उपचार केंद्रात उपचारासाठी पाठविले. मला टाके लागले होते. त्यानंतर तेथून मला पुन्हा गाडीमध्ये पोलीस ठाण्यात आणले व रात्री ०९.१४ वाजता माझी तक्रार नोंदवली. तक्रारीतील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. तक्रार **निशाणी क्र. २४** वर आहे. प्रथम खबरी अहवालातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. तक्रार **निशाणी क्र. २५** वर आहे. मी आरोपींना ओळखतो, ते न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०३. माझे गावाची लोकसंख्या ४,०९८ आहे. हे म्हणणे खरे आहे की, जागेचा ७/१२ माझे नावावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या जागेवर आरोपी होते ती जागा कोणाच्या मालकीची आहे हे न्यायालयामार्फत आजपर्यंत सिद्ध झालेले नाही. जागेची सरकारी मोजणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताबेकब्जात असलेल्या जागेबाबत वाद होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ताब्याबाबत वाद होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे म्हणणे आहे की, ती जागा ते कसत आहेत व त्यांच्या कब्जात आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आरोपी बळजबरीने ताबा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. या जागेवरुन आरोपींशी माझे संबंध चांगले नाहीत.

०४. घटनास्थळावर कोणीही ये जा करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी दगड होते. साक्षीदार सांगतो की, लहान दगड होते. मी तक्रारीवर वाचून समजून सही केलेली आहे. एक आठवड्यापूर्वी आरोपींनी जाळपोळ केली होती यातील 'एक आठवड्यापूर्वी' हे मी तक्रार देतेवेळी पोलीसांना सांगितले होते. तसेच वाघमोडे यांनी आरोपी दुस–या दिवशी येणार आहेत असे सांगितले होते, तसेच दि. २६/०४/२०२१ रोजी मी ग्रामपंचायतीचे निरीक्षणाचे काम करत होतो या बाबी सुद्धा तक्रार देतेवेळी सांगितल्या होत्या. प्रतिक्षा राणे हिच्या हातात बांबूची काठी होती तसेच जे.सी.बी. बाहेर काढायला सांगितले होते, हे तक्रार देतेवेळी सांगितले होते. ०४.१८ वाजता मला फोन आला होता, असे घडले होते.

०५. बांबूच्या झोडी टाकल्या, असा प्रकार घडला होता. मला दोन तीन झोडी मारल्या होत्या. त्यातील एक डोक्यावर व बाकी अंगावर मारल्या होत्या. वैद्यकीय तपासणीच्या वेळी मी हे सर्व दाखविले होते. माझे डोक्यातून रक्त आले होते. माझे कपड्यावर रक्त पडले होते. हे म्हणणे खरे नाही की, जमिनीवर सुद्धा रक्त पडले होते. पोलीसांनी रक्त लागलेले कपडे पाहिले होते.

०६. आरोपी घटनास्थळी काम करत होते. घटनास्थळाला लागून आरोपीचे शेत आहे. घटनेच्या वेळी घटनास्थळाची सरकारी मोजणी झालेली नव्हती त्यामुळे आरोपी नेमके कुठे काम करत होते हे मी आता सांगू शकत नाही. एप्रिल महिन्यामध्ये साधारणत: शेतातील झाडीझुडी साफ करण्याचे काम केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी काम करत असलेली जागा ही माझी आहे असा माझा समज झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी जावून प्रतिक्षा राणेला मिठी मारली व ओमकार राणेला मारहाण केली. आरोपींनी माझेविरुद्ध तक्रार केल्याची मला माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावरुन पळून गेलो व पळून जाताना पडलो

त्यामुळे मला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझेवर कोणतीही कारवाई होवू नये म्हणून मी आरोपींविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे भावाने बनाव करुन खोटी तक्रार दाखल केली आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** ) ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **२२/०९/२०२२**.

**R.C.No. 78/2021**
Exh. **33/C**

Deposition of Witness No. **04** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Supriya Vishwanath Wetkoli** |
| Age about | : | 35 Years, Occupation : Medical Practitioner |
| Residence | : | Alibag, Dist. Raigad |

**Examination-in-Chief by A.P.P. Kumari Kavita Parit** :

I am qualified as M.D. (Ayurvedic). I am practicing since the year 2011. I was attached to PHC, Dhokawade on 26/04/2021. On that day, I medically examined Mahendra Machchhindra Kawle. He stated history of assault by known person. Head constable Zemase brought him to me. After examination, I found following injuries

01. Contused lacerated wound over parietal region posterior on left side. It was fresh injury and simple in nature.
02. Blunt trauma below left eye. It was fresh injury and simple in nature.

02. I have brought original medico-legal register. After examination I issued injury certificate. The contents of the certificate are true and correct and bears my signature. It is at **Exh. 34**. The injuries are possible by stone and wooden stick.

**Examination-in-Chief over**.

<u>**Cross-Examination for accused by Adv. Shri. Darshan Baikar**</u> :

03. It is mentioned in Medico-Legal register that the patient is beaten by wooden stick and stone. Injury No. 01 is of linear in nature. It is true to say that the said injury is not possible by stone. It is not true to say that if a hard blow of wooden stick is given then the injury will be more severe than mentioned in MLC register. If stick blow given from front side, injury will not cause to rear side of head. Witness volunteers that if a person is bent down and blow is given, then injury to rear head is possible.

04. Injury No. 02 was not visible. It is not true to say that after half an hour of injury, that injury changes colour. It is true to say that it is not mentioned in ML register that how much stitches given to patient. It is true to say that if a person comes in contact with hard and blunt object the injuries are possible.

05. It is not true to say that the patient narrated false history of assault and he came with self inflicted injury. It is not true to say that on the basis of false information I issued false injury certificate.

Cross-examination Over.

No Re-examination

R. O. & A. C.

Alibag.
Dt. **14/02/2023**.

(**S.W. Ugale**)
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

:: **<u>C E R T I F I C A T E</u>** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition was explained and full opportunity to cross-examine the witness is given.

Alibag.
Dt. **14/02/2023**.

(**S.W. Ugale**)
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

नियमीत फौजदारी खटला क्र. **७८/२०२१**
निशाणी क्र. **६२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **पुष्पा नारायण वाघमारे** |
| वय सुमारे | : | ४० वर्षे, व्यवसाय : महिला पोलीस हवालदार |
| सध्या नेमणूक | : | पेण पोलीस ठाणे |
| निवासस्थान | : | मु. सापोली, ता. पेण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत</u>:**

०१. दि. २६/०४/२०२१ रोजी मी मांडवा सागरी पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी मी ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होते व सदरचा गुन्हा मी नोंदवून घेतला. तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद निशाणी क्र. २४ तिच आहे. छापील खबर सुद्धा मीच नोंदवलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद निशाणी क्र. २५ तिच आहे.

०२. माझ्याकडे खबर, सी.टी.एन्.एस् मधील खबर इत्यादी कागदपत्र होते. मी गुन्ह्याच्या घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे टिपण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. मी दि. ०८/०५/२०२१ रोजी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. २२ तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे.

०३. मी आरोपींना अटक केली. मी आरोपींना ओळखते. आरोपी आज

रोजी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपींच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.) माझ्या तपासात आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०४. मांडवा पोलीस ठाणे ते घटनास्थळ यांतील अंतर ३ कि.मी. आहे. त्या दिवशी फिर्यादी सायं. ५:०० वाजता पोलीस ठाण्यात आले. फिर्यादी पोलीस ठाण्यात ५:३० वाजेपर्यंत होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले नाहीत.

०५. हे म्हणणे खरे आहे की, २६ तारखेला मी घटनास्थळी गेले नाही. मी २७ तारखेला घटनास्थळी गेले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी रक्ताचे डाग मिळून आले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन कोणतीही वस्तू जप्त करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळाचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळामध्ये गट क्रमांक फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जे.सी.बी. जप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक वाहनाच्या टायरचा आकार वेगवेगळा असतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर असलेल्या टायरच्या खुणांचे मोजमाप घेतलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने त्या जे.सी.बी. च्या टायरच्या खुणा असल्याचे सांगितल्याने पंचनाम्यात तसे नमूद करण्यात आले आहे. घटनास्थळाचा पंचनामा दि. ०८/०५/२०२१ रोजी करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०५/२०२१ पूर्वी मी घटनास्थळी गेले नाही.

०६. घटनास्थळी मी २७ तारखेला गेले होते परंतु २७ तारखेला पंचनामा पूर्ण झाला नाही त्यामुळे ८ तारखेला घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला होता. मी तपासकामी घटनास्थळाचा ७/१२ उतारा प्राप्त केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा नकाशा काढला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपींमध्ये जागेवरुन वाद चालू आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तपासात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सापडून आला नाही.

०७. फिर्यादीने फिर्याद देताना एक आठवड्यापूर्वी जाळपोळ केली होती ही बाब सांगितली नव्हती. तसेच फिर्यादीने फिर्याद देताना वाघमोडे दुसऱ्या दिवशी येणार आहेत ही बाब सांगितली नव्हती. फिर्यादीने फिर्याद देताना दि. २६/०४/२०२१ रोजी फिर्यादी ग्रामपंचायतीच्या निरीक्षणाचे काम करत होते हे सांगितले नव्हते. तसेच फिर्यादीने फिर्याद देताना प्रतिक्षा राणे हिच्या हातात बांबूची काठी होती ही बाब सांगितली नव्हती. तसेच फिर्यादीने फिर्याद देताना 'जे.सी.बी. बाहेर काढा' असे सांगितले नव्हते.

०८. सुरेंद्र कवळे यांचा जबाब दि. ०९/०५/२०२१ रोजी नोंदवण्यात आला होता. त्यांचा जबाब त्यांना वाचायला दिला होता. त्यांच्या जबाबातील अधोरेखीत भाग 'अ' बरोबर आहे. अधोरेखीत भाग 'अ' यास **निशाणी क्र. ६३** देण्यात येते. सुरेंद्र कवळे याने त्याच्या जबाबात सांगितले नव्हते की, 'भावाचा चष्मा आणण्यासाठी घटनास्थळी गेलो असता तेथे जे.सी.बी. चालू होता त्यामुळे काम बंद ठेवा असे मी सांगितले होते.' सुरेंद्र कवळे याने कोणते वाहन आणले होते याबाबत मी चौकशी केली नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिक्षा प्रमोद राणे यांनी फिर्यादीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३५४ प्रमाणे केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हा पंचांवर दबाव टाकत असल्यामुळे पंचनामा पूर्ण होवू शकला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी तपासकामी सहकार्य करत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने याकामी कोणतेही साक्षीदार उपलब्ध करुन दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला कोणत्याही प्रकारची मारहाण झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीची कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी जाताना स्टेशन डायरीला नोंद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी फिर्याद देण्यासाठी आल्याबाबत स्टेशन डायरीला नोंद केलेली नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीसोबत गैरवर्तन केले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपींविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला पडून मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, तपासकामी कोणतेही हत्यार जप्त करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या दबावापोटी खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **११/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.